# प्रामाणिकपणे समाजाची सेवा करा

## पालकमंत्री दीपक केसरकर यांचे आवाहन

**दोडामार्ग, दि.३० (प्रतिनिधी)**

जीवनात कोणतेही काम करताना कोणीही कमीपणा बाळगू नये. आपल्याला मोठे व्हायचे असेल तर कामाशी एकनिष्ठ राहून, न लाजता ते प्रामाणिकपणे करावे, मनुष्य हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. समाजाच्या आपल्याकडून काही अपेक्षा असतात व आपणही समाजाचे देणे लागतो, समाजाचे हे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले, समाजाची सेवा केली पाहिजे. सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून आपण एक चांगला नागरिक बनू शकतो. विद्यार्थ्यांवर हे सर्व संस्कार घडविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून होत असते. हा एक सामाजिक सेवा करण्याचा प्रभावी मार्ग आहे. ते मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व लक्ष्मीकांत सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित केलेल्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

दोन दिवस चालणाऱ्या या शिबिरात स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाची संकल्पना व ते कसे करावे, याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच त्यांच्याकडून प्रात्यक्षिके करून घेतली जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य व स्वातंत्र्यसेनानी भाई परमेकर होते. त्यांच्या हस्ते दीपक केसरकर यांचा तर प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मुंबई विद्यापीठ एन.एस.एस. विभाग समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पाटील यांनी केले. या शिबिराची संकल्पना, महत्त्व प्रा. बी. एस. बिडवे यांनी सांगितले. यावेळी प्रांताधिकारी व्ही. जी. इनामदार, तहसिलदार संतोष जाधव, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य बाबूराव धुरी, सूचना कोरगावकर, उपसभापती आनंद रेडकर स्वयंसेवक उपस्थित होते.




*लक्ष्मीकांत सीताराम हळबे महाविद्यालयात जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री दीपक केसरकर यांचा सत्कार करताना मान्यवर.*